

# बर्वे यांना सन्मान

संगीता राजीव बर्वे (मराठी) आणि ज्योती कुंकळकर (कोंकणी) यांच्यासह २२ भाषांतील लेखकांना बालसाहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आले.



पुणे, बुधवार, १६ नोव्हेंबर २०२२





**नवी दिल्ली : साहित्य अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर कंबार यांच्याकडून मराठीसाठी यंदाचा अकादमी बालसाहित्य पुरस्कार स्वीकारताना संगीता बर्वे. कोंकणी भाषेसाठी ज्योती कुंकळकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.**

# संगीता बर्वे यांना अकादमी सन्मान

## राजधानीत सोहळा ; कोंकणीसाठी ज्योती कुंकळकर यांना पुरस्कार

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. १५ - बालसाहित्य लिहिणे म्हणजे एखाद्या उद्यानात फेरफटका मारण्याइतके सोपे नसून 'वाचकवर्ग' हा बालके व मुले असल्याने ते फार कठीण काम आहे. त्यामुळेच बालसाहित्य व बालसाहित्यिकांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे असे प्रतिपादन प्रख्यात हिंदी लेखक आणि बालसाहित्यिक प्रकाश मनू यांनी केले. साहित्य अकादमीच्या वतीने दिल्या जाणाऱ्या बालसाहित्य पुरस्कारांचे वितरण अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर कंबार व मनू यांच्या हस्ते झाले. संगीता राजीव बर्वे (मराठी) आणि ज्योती कुंकळकर (कोंकणी) यांच्यासह २२ भाषांतील लेखकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. ताम्रपट आणि प्रत्येकी ५० हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

अकादमीचे सचिव डॉ. के श्रीनिवास राव, उपाध्यक्ष माधव कौशिक आदी उपस्थित होते. मनू यांनी सांगितले, की मुले ही कोणत्याही देशाची केवळ भावी पिढी नसते तर ते त्या त्या देशाच्या उज्ज्वल भवितव्याचे द्योतक असतात. त्यामुळेच बालसाहित्य जास्तीत जास्त लिहिले-वाचले गेले पाहिजे.

**बालसाहित्य पुरस्कार २०२२ विजेते लेखक :** अर्शिया सत्तार (इंग्रजी), जफर कमाली (उर्दू), क्षमा शर्मा (हिंदी), दिगंत ओझा (आसामी), जया मित्रा (बंगाली), देवबर रामसियारी (बोडो), राजेश्वर सिंग 'राजू' (डोगरी), किरीट गोस्वामी (गुजराती), तम्मन बिगार (कन्नड), हमिदुल्ला वाणी (काश्मिरी), वीरेंद्र झा (मैथिली), ए. सेतुमाधवन (सेतु) (मल्याळम), नौरेम लोकेश्वर सिंग (मणिपुरी), मीना सुब्बा (नेपाळी), नरेंद्र प्रसाद दास (उडिया), विश्वामित्र दधीच (राजस्थानी), कुलदीप शर्मा (संस्कृत), गणेश मरांडी (संथाली), मनोहर निहलानी (सिंधी), जी. मीनाक्षी (तमीळ) आणि पट्टीपाका मोहन (तेलुगू).